३६०

असा. क्र. ३५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, एप्रिल २४, १९९९ / वैशाख ४, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका

पृष्ठे

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.—मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याची मुदत वाढविण्याकरिता अधिनियम ४०६–४०७

दिनांक २३ एप्रिल १९९९ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

### सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

[राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २४ एप्रिल १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याची मुदत वाढविण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९४७ चा मुंबई ५७. १९९९ चा महा. अध्या. ६.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याची मुदत वाढविण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १४ मार्च १९९९ रोजी मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण (मुदतवाढ) अध्यादेश, १९९९ प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण (मुदतवाढ) अधिनियम, १९९९ असे म्हणावे.

(२) तो दिनांक १४ मार्च १९९९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७ याच्या कलम ३ ची सुधारणा. २. मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मध्ये, "१९९९" या मजकुराऐवजी "२०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९४७ चा मुंबई ५७.

सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ चे निरसन व व्यावृत्ती. ३. (१) मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण (मुदतवाढ) अध्यादेश, १९९९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९९ चा महा. अध्या. क्रमांक ६.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये, यथास्थिति, करण्यात आलेली कृती किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई